CNR NO. MHPU100001652023

| |
|---|
| दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पी.सी.एम.सी. न्यायालय, आकुर्डी, पुणे यांचे न्यायालयासमोर |
| रे. दि. मु. नं. **६६/२०२३** |
| मे. भुवि अ विंग सहकारी संस्था मर्या. वाकड, पुणे |
| वि. |
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इतर |

## नि. क्र. ४९ वरील आदेश

सदरचा अर्ज हा वादीने दाव्यात अतिरिक्त मुद्दे समाविष्ट करण्यासाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविले. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी अर्जाचे पाठीमागे व प्रतिवादी क्र.१ यांनी नि.५१ द्वारे म्हणणे दाखल केले.

३. वादीतर्फे अधिवक्ता असे कथन करतात की, दावा मिळकतीचा विकास व वापर प्रतिवादी क्र.१ ने मंजूर केलेला असुन दावा मिळकत ही वाहन तळ असल्याने त्याचा वापर वादी व त्याचे सदस्य यांना करण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबत दाखल केला आहे. प्रतिवादींनी लेखी जबाब दाखल केल्यानंतर प्रकरणात दि.२०/०९/२०२४ रोजी मुद्दे काढले आहेत. परंतु प्रकरणात दावा मिळकतीचा प्रत्यक्ष वापर वाहनतळ करिता करत होते. तसेच प्रतिवादी यांनी वादी संस्थेत बेकायदेशीररित्या प्रवेश करुन कथित भिंत उभी करुन वादीचे वाहनतळ वापराचे कायदेशीर हक्कास प्रतिवादी क्र.१ ने अटकाव केला आहे. असे दोन अतिरिक्त मुद्दे काढण्यात यावे. ज्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही व त्यांचा अर्ज मंजूर करावा असा युक्तीवाद केला.

४. प्रतिवादींनी सदर अर्जास ठाम विरोध दर्शविला व प्रस्तावित अतिरिक्त मुद्दे

हे अगोदरच न्यायालयाने काढले असुन मुद्दा क्र. १ मध्ये ते समाविष्ट आहेत. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

५. वादीतर्फे अधिवक्ता श्री. शेंडे, प्रतिवादी क्र.१ तर्फे श्रीमती यादव व प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे श्री. तिवारी यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

६. अभिलेख पाहिला. सदरचा दावा हा वादीने ठराव व निरंतरचा मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ते ३ हजर होवुन त्यांनी लेखी जबाब दाखल केला आहे व दि.२०/०९/२०२४ रोजी मुद्दे नि.४४ अन्वये काढलेले आहेत. वादी सदरचे अर्जाद्वारे असा युक्तीवाद करतात की, दाव्याचा यौग्य तो निकाल लागण्याकरिता खालील दोन अतिरिक्त मुददे काढणे आवश्यक आहे.

१. वादी दावा मिळकतीचा प्रत्यक्ष वापर वाहनतळाकरिता करत आहे?

२. प्रतिवादी हे वादी संस्थेत बेकायदेशररित्या प्रवेश करुन कथीत भिंत उभी करुन वादीचे वाहनतळास कायदेशीर हक्कास प्रतिवादी क्र.१ यांनी अटकाव केला आहे?

७. वास्तविकतः नि.४४ वरील मुदयांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता वादीने प्रस्तावित केलेले मुद्दे हे मी अगोदरच मुद्दा क्र.१ व २ नुसार काढलेले आहेत. ते मुद्दे सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर असुन दावा मिळकतीवर वाहनतळ मंजूर अराखडयाचा भाग आहे हे त्यांनी सिध्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या अर्जामध्ये कुठलेही तथ्य दिसुन येत नाही व अगोदरच प्रस्तावीत मुद्दे काढलेले असल्यामुळे सदरचा अर्ज मंजूरीस पात्र नाही म्हणुन मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

सदरचा अर्ज प्रत्येकी रक्कम रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) प्रतिवादीला खर्च म्हणुन देण्यासह नामंजूर करण्यात येतो.

सही/-

आकुर्डी, पुणे. (व्ही. एस. डामरे)

दि.२०/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आकुर्डी, पुणे.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order.

Name of Stenographer :- P. B. Jadhav (Grade III)

Court Name :- Shri. V. S. Damare,
Civil Judge Junior Divison,
(P.C.M.C. Court), Akurdi,
Pune.

Date :- 20/08/2025
Judgment signed by
presiding officer on :- 20/08/2025
Judgment uploaded on :-20/08/2025